# University of Mumbai

**अति महत्वाचे**

दूरध्वनी क्र. : 022-2261 8987
022-2270 8738
Email ID : supt.statunit@gmail.com

सांख्यिकी कक्ष,
फोर्ट, मुंबई– ४०० ०३२.

**No.UDSTAT/ICD/2017-18/AISHE/138 of 2018**

परिपत्रक :-

**विषय : अखिल भारतिय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ बाबत.**

**संदर्भ : क्र. उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०१७-१८/३८५, दिनांक ९ जानेवारी, २०१८**

---

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था यांचे प्राचार्य/संचालक यांचे संबंधित परिपत्रकाकडे लक्ष वेधू इच्छितो की, राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी व सर्व महाविद्यालये/संस्था यांचे सर्वेक्षणामध्ये समावेश होण्याच्या दृष्टीकोनात विचार करता अत्यावश्यक असलेली Online माहिती त्यांनी दिलेल्या Web Portal नोंदविणे आवश्यक आहे.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षाकरिता संचालनालयाकडून सुचीत केल्याप्रमाणे अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण AISHE कार्यक्रम हा संचालक, मानवसंसाधन विकास (MoHRD) नवी दिल्ली, निर्मित सर्वेक्षणाच्या कामकाजाबाबत आपणास विचारण्यात आलेली माहिती ही अत्यंत महत्वपुर्ण व शासनास पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी उपयुक्त असल्याने ती आपल्या मार्फत त्वरीत सादर करणे गरजेचे आहे.

**अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम AISHE :-**
**शैक्षणिक वर्ष २०१७-१८ वर्षाकरीता संचालनालयाकडून विचारण्यात आलेली Online पद्धती नुसार 1) College Institution Form - DCF - II (Attached to University) महाविद्यालये व संस्था यांच्याकडून मागविलेली माहिती, 2) Other Minority Form - DCF-IV- महाविद्यालये व संस्था यांच्याकडे असलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या नोंदणी बाबत व 3) Teachers Information Format- TIF शिक्षकांबाबतची माहिती ही संचालनालयामार्फत शासनास सादर करण्याच्या हेतूने व कार्यालयीन कामाची योग्य ती कार्यवाही पुर्ण करण्याच्या हेतूने ती दिनांक ३० जानेवारी, २०१८ पर्यंत संचालनालयास विनाविलंब सादर करणे आवश्यक आहे.**

अखिल भारतीय उच्च शिक्षण AISHE सर्वेक्षण कार्यक्रम हा संचालक, मानव संसाधन विकास (MHoRD), नवी दिल्ली, यांनी दिलेल्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षाकरिता AISHE बाबतची Online माहिती www.aishe.gov.in या Web Portal वर उपलब्ध असलेल्या विवरण-पत्रामध्ये Online स्वरूपात भरावयाची आहे.

**उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता आपल्या असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सर्वेक्षणाद्वारे शासनास उपलब्ध असलेली विविध शैक्षणिक बाबींची महत्वाची माहिती लक्षात घेता महाविद्यालये/संस्था यांनी ती Online पद्धतीने नोंदविणे अत्यंत आवश्यक आहे.**

**त्याबाबत आपले अधिकारी वर्ग/कर्मचारी वर्ग यांना आपल्या उच्चस्थरावरून सुचित करावे की, प्रती शैक्षणिक वर्षानुसार संचालनालयास महत्वपुर्ण असलेली माहिती Web Portal वर उपलब्ध असलेल्या विवरण-पत्रामध्ये Online स्वरूपात भरून महाविद्यालयातील प्राचार्य यांच्या शिक्का व सहीने परिपुर्ण असलेल्या प्रमाणपत्रासहित विद्यापीठास सादर केल्या शिवाय महाविद्यालये/संस्था यांचे मार्फत येणारे परिक्षा अर्ज (Exam Form), नोंदणी अर्ज (Enrollment Form), महाविद्यालयांची संलग्नता (Continuation /Extension), प्राचार्य व शिक्षक मान्यता (Approval), जाहिरात-मसूदा व बिंदुनामावली इ. गोष्टी तपासली जाणार नाहीत, याची नोंद असावी.**



Scanned by CamScanner

# University of Mumbai



सर्वेक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून Online स्वरूपातील माहिती विवरण पत्रामध्ये भरण्याबाबत आपणास काही समस्या/ अडचणी उद्‌भवल्यास खालील दिलेल्या रकाण्यातील ठिकाणानुसार संपर्क साधावा व त्याचप्रमाणे तत्संबंधित माहिती Online पद्धतीने विहित विवरण पत्रामध्ये महत्वाची बाब विचारात घेता माहिती तात्काळ भरून पाठवावी, जेणेकरूण महाराष्ट्र शासन व संचालनालय यांना ती योग्य व अचूक स्वरूपात प्राप्त होईल.

याकरीता सर्व संबंधित महाविद्यालये व संस्था यांनी ती त्वरित अपलोड करावीत व त्याबाबतचे हमीपत्र/प्रमाणपत्र भरून मुंबई विद्यापीठ, सांख्यिकी कक्ष, फोर्ट, यांच्याकडून <u>ना-हरकत</u> प्रमाणपत्र (No Objection Certificate) घ्यावे.

| Contact Person | Office | Land Line No. | E-mail ID |
|---|---|---|---|
| Nodal Officer (AISHE/MIS Cell) | University of Mumbai, Statistical Unit, Room No. 202, Fort, Mumbai- 400 032. | 022 - 2270 8738<br>022 - 2261 8987 | supt.statunit@gmail.com |
| AISHE Call Centre, Pune. | Director of Higher Education, Government of Maharashtra, Pune. | 011-2671 3604<br>020-6500 1016<br>020-6500 1173 | stat.dhepune@nic.in |

**<u>टिप्पणी</u>** : सदर कक्षामार्फत AISHE व Studetns on Roll कार्यक्रमाबाबतचे आवश्यक असलेले **<u>हमीपत्र/प्रमाणपत्र</u>** आपल्या महाविद्यालयातील/संस्थेतील ऑनलाईन माहिती पूर्ण भरून झाल्यानंतरच एकत्रित स्वरूपात दिले जाईल व त्याचप्रमाणे संबधित <u>हमीपत्र/प्रमाणपत्र</u> याचा नमुना आपल्या महाविद्यालयाच्या ईमेल आयडीवर आणि विद्यापीठाच्या वेबसाईटवर पाठविण्यात येत आहे, याची कृपया नोंद असावी.

मुंबई – ४०० ०३२
दिनांक : ११/०१/२०१८

उपकुलसचिव 11/01/18
(जनसंपर्क/सांख्यिकी कक्ष)

<u>प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता रवानाः-</u>

१. संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
२. परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),मुंबई-४०० ०९८.
३. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
४. उपकुलसचिव, घटक महाविद्यालये, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
५. उपकुलसचिव, पदवुत्तर विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
६. उपकुलसचिव, विशेष कक्ष, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
७. उपकुलसचिव, नाव नोंदणी विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ(पूर्व),मुंबई-४०० ०९८.
८. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
९. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ(पूर्व),मुंबई-४०० ०९८.

**यांना असे कळविण्यात येते की, AISHE बाबतची माहिती विद्यापीठ विभाग व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांनी भरणे अनिवार्य असून सदर माहिती न भरल्यास त्या विभागाचे/महाविद्यालय/संस्थेच्या विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज (Exam.Form) व नोंदणी अर्ज (Enrollment Form)<u>महाविद्यालयाची संलग्नता (Continuation/Extension)</u> /प्राचार्य/शिक्षक <u>मान्यता (Approval)</u> व महाविदयालये/संस्थांचे कोणतेही पत्रव्यवहार स्विकारू नयेत तसेच जाहिरात, मसुदा, बिदुंनामावली तपासणी करू नये असे आदेश मा. संचालक, संचालनालय, उच्च शिक्षण विभाग, पुणे, व मा. कुलगुरू, मुबंई विद्यापीठ यांनी दिलेला असून त्याप्रमाणे प्रत्येक संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थेकडून त्याबाबतचे प्रमाणपत्राची छायांकीत प्रत संबंधितांकडून घेण्यात यावी व त्यानंतर पुढील कार्यालयीन कार्यवाही करावी.**

उपकुलसचिव 11/01/18
(जनसंपर्क/सांख्यिकी कक्ष)

Scanned by CamScanner

सांख्यिकी कक्ष, फोर्ट
खोली क्र. २०२

# प्रमाणपत्र/हमीपत्र
## शै. व. २०१७-१८

दिनांक :

असे प्रमाणित करण्यात येते की, आपण दिलेल्या प्र-पत्राच्या वहित नमुन्या प्रमाणे संकलित केलेली माहिती रकान्यानुसार खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | विषय व संकेतस्थळ | परिपत्रक क्रमांक | माहिती भरली आहे / नाही | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | विद्यार्थी संख्या माहिती (Students on Roll) शै. व. २०१७-१८ www.eoffice.mu.ac.in/statistical | No.UDSTAT/ICD/2017-18/**104** of 2017, Dt. 3rd November, 2017 | | रकान्यात नमूद केलेले सर्व संबंधित Online माहिती विषयीची शै. व. २०१५-१६ व २०१६-१७ बाबतचे सदर कक्षातील प्राप्त झालेले हमीपत्र/प्रमाण पत्राची प्रत सोबत पडताळणीसाठी घेऊन येणे. (त्याचप्रमाणे शै. व. २०१७-१८ संबंधित प्रमाणपत्राच्या **मुळ दोन प्रती** सोबत घेऊन येणे.) |
| २. | अखिल भारतीय उच्च शिक्षण संस्था (AISHE) शै. व. २०१७-१८ www.aishe.gov.in | No.UDSTAT/ICD/2017-18/**138** of 2018, Dt.11th January, 2018 | | |
| ३. | व्यवस्थापकीय माहिती पद्धत शै. व. २०१७-१८ (MIS) dhemis.maharashtra.gov.in | No.UDSTAT/ICD/MIS/2017-18/ **105** of 2017, Dt.3rd November, 2017 | शै. व. २०१७-१८ या वर्षासाठी घेतलेल्या प्रमाणपत्राची एक छायांकित प्रत सोबत पडताळणीसाठी घेऊन येणे. | |

उपरोक्त रकान्यानुसार दर्शविल्याप्रमाणे पोर्टलवर भरलेली अत्यावश्यक माहिती परीपूर्ण व अचूक आहे. संबंधित माहितीमध्ये काही त्रुटी आढळल्यास महाविद्यालयाचा/ संस्थेचा प्राचार्य/प्रमुख या नात्याने मी सर्वस्वी जबाबदार राहीन, याची मी ग्वाही देतो/देते.

Contact:-________________
Email Address:-________________________________

संचालक/ विभाग प्रमुख /प्राचार्य
(नाव, सही व शिक्का)

..............................................................................................

## कार्यालयीन कामकाजाकरीता

________________________________________________

________________________________________ महाविद्यालयाची AISHE, MIS व STUDENT ON ROLL शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षाची माहिती सांख्यिकी कक्षाकडे प्राप्त झालेली असून सदर महाविद्यालयांचा परिक्षा अर्ज/नोंदणी अर्ज, महाविद्यालयाची संलग्नता (Continuation/Extention)/प्राचार्य/शिक्षकमान्यता (Approval) स्विकारण्यास तसेच जाहिरातमुसदा व बिंदूनामावली तपासण्यास हरकत नाही.

नोडल अधिकारी,
(AISHE/MIS Cell)

दिनांक :-

Scanned by CamScanner